# कॉस्ट अकाउंटंट संघटनेच्या अध्यक्षपदी गोरे

औरंगाबाद, ता. ९ : औरंगाबाद चॅप्टर ऑफ कॉस्ट अकाउंटंट संघटनेच्या अध्यक्षपदी आर. पी. गोरे, तर सचिवपदी बिश्वेश्वर सेन यांची निवड करण्यात आली.संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक नुकतीच झाली. तीत नवीन वर्षासाठीची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. उर्वरित कार्यकारिणी पुढीलप्रमाणे : उपाध्यक्ष एस. के. जैग, आर. बी. शुक्ला, उपसचिव पी. एच. पटेल, खजिनदार आर. बी. मुळी. प्रशिक्षण समिती ए. आर. जोशी, व्यवसाय विकास समिती एम. आर. पंडित, विशेष कार्यकारी समिती पी. के. खेमका, ऑडिटर म्हणून एन. आर. शर्मा यांची नियुक्ती करण्यात आली. एस. आर. पिंपळे यांनी सूत्रसंचालन केले. बिश्वेश्वर सेन यांनी आभार मानले. याप्रसंगी आर. जी. मोदाणी, ए. एम. पुजारी, ए. आर. अस्थाना, एन. एस. बांगड, जी. आर. कुलकर्णी, एस. पी. बंगाले, चिश्ती अजीज, एस. जे. देवरे, एन. के. जोशी, एस. बी. खडके, रवींद्र कुमार, ए. के. मिश्रा, एस. एम. राठी, नीता रोजवानी, देबाशिष सरकार, अरुण अग्रवाल, ए. के. चंगोलिया, संजय पालेचा आणि लोकेश लाहोटी आदींची उपस्थिती होती.



**औरंगाबाद येथील कॉस्ट अकाउंटंट संघटनेची नवीन कार्यकारिणी**

AINIK SAKAL

10TH JUNE, 2006

Lokmat times
June 2.6.06

# Gore re-appointed as ICWAI president

**LOKMAT NEWS SERVICE**




New executive body of ICWAI Aurangabad branch.

**Aurangabad, June 1:** RP Gore was reappointed as president of Aurangabad branch of Institute of Cost and Works Accountants of India (ICWAI).

ICWAI Aurangabad branch has organised annual general meeting led by Gore on Wednesday evening. New executive body for the year 2006-07 was announced in this meeting. Sunil Jain and Rajesh Shukla were appointed as vice-presidents while Vishweshwar Sen and PH Patil were appointed as secretary and joint secretary respectively. RB Mule was appointed as treasurer. MR Pandit was appointed as president of Business Development Committee and PK Khemka appointed as president of Special Executive Committee. Nitin Sharma was appointed as auditor. AR Joshi and MR Pandit reviewed last year's work.

SR Pingle conducted the proceedings and Vishweshar Sen proposed vote of thanks. Ramananad Modani, AM Pujari, AR Asthana, NS Bangad, Neeta Ronchwani and many others were present in the meeting.

LOKMAT TIMES
June 2.6.06

# मुक्त अर्थव्यवस्थेमध्ये कॉस्ट अकौंटंट्सना मोठी मागणी

## रमेश जिहानी यांचे प्रतिपादन

औरंगाबाद, ता. १३ : ''मुक्त अर्थव्यवस्थेत जागतिक स्पर्धेला तोंड देण्यासाठी उत्पादनांची किंमत कमी ठेवण्यावर भर दिला जातो. त्यासाठी उपलब्ध साधनांचा परिपूर्ण वापर करणे आणि अपव्यय टाळणे आवश्यक आहे. या कामात कॉस्ट अकौंटंट्स व्यवस्थापनास योग्य ती माहिती देऊन मदत करतात, त्यामुळे येणाऱ्या काळात कॉस्ट अकौंटंट्स आणि विद्यार्थ्यांना उद्योग जगात मोठी मागणी येणार आहे,'' असे प्रतिपादन एंड्युरन्स ग्रुप ऑफ कंपनीजचे उपाध्यक्ष रमेश जिहानी यांनी केले. अध्यक्षस्थानी एसबीआय- आयएफबीचे उपसरव्यवस्थापक बी. डी. देशपांडे होते. औरंगाबाद चॅप्टर ऑफ कॉस्ट अकौंटंट्सच्या (आयसीडब्ल्यूए) मार्गदर्शन वर्गाचे उद्घाटन श्री. जिहानी यांच्या हस्ते झाले. चॅप्टरचे उपाध्यक्ष राजेश शुक्ला यांनी स्वागत केले. अध्यक्ष आर. पी. गोरे यांनी चॅप्टरच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. प्रशिक्षण समितीचे ए. आर. जोशी यांनी मार्गदर्शन आणि विविध सुविधांची माहिती दिली. सरस्वती भुवन महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. जगदीश खैरनार यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

### आयसीडब्ल्यूए मार्गदर्शन वर्ग प्रारंभ

विद्यार्थ्यांतर्फे आशीष देवढे यांनीही मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन राजेश शुक्ला यांनी केले. आर. बी. मुळी यांनी आभार मानले. कार्यक्रमाला कॉस्ट अकौंटंट्स एम. आर. पंडित, एस. आर. पिंपळे, आर. जी. मोदानी, अमित भालगावकर, एसबीआय- आयएफबीचे मुख्य व्यवस्थापक विनोदकुमार मिश्रा, प्रा. ए. बी. देशपांडे, राहुल लोहाडे, शिल्पा येवले, मिलिंद देशपांडे, अनिल कुलकर्णी, शिल्पा विद्वांस, सुनील मणियार, प्रसाद देशमुख आदी उपस्थित होते.




'आयसीडब्ल्यूए' मार्गदर्शन वर्गाच्या उद्घाटन कार्यक्रमाला उपस्थित राजेश शुक्ला, डॉ. जे. एम. खैरनार, बी. डी. देशपांडे, रमेश जिहानी, आर. पी. गोरे आणि ए. आर. जोशी.